QRickit

0224CH09



# 9 हा कोणता ऋतू आहे?

## ऋतू



एका वर्षात येतात पाच ऋतू।
आनंद आणतो वसंत ऋतू।
फुले उमलती, पक्षी गाती,
सर्वांना आवडे वसंत ऋतू।

सूर्य तळपतो येता उन्हाळा।
मुलांना खेळायला दिवस
होतो मोठा।





पावसाळ्यात टपटप थेंब
पडतात।
मोर नाचतात आणि बेडूक
बागडतात।

© NCERT not to be republished

शिशिर ऋतूचे आगमन होते
गळून पडती झाडांची पाने,
वाहत असती सुखद वारे।





हिवाळा तर हिम घेऊन
येतो।
डोक्यापासून मी त्यातच
न्हातो।



## चर्चा करू या

A. कुठल्या ऋतूमध्ये तुम्ही सुट्टीसाठी बाहेरगावी जाता?

B. वर्षातल्या कोणत्या ऋतूमध्ये तुमचा वाढदिवस येतो?

C. तुमचा आवडता ऋतू कोणता? का?

D. तुमच्या आवडत्या ऋतूचे वैशिष्ट्य काय आहे?

ही कविता मोठ्याने वाचा आणि त्यावर अभिनय करा। प्रत्येक ऋतूत केल्या जाणाऱ्या खास गोष्टींबद्दल मुलांशी चर्चा करा। त्या त्या ऋतूतील स्थानिक खाद्यपदार्थ तसेच कपड्यांबद्दल बोला। उदा। काश्मीरमधील फेरन। ऋतूंमधील बदलांमुळे लोकांच्या दैनंदिन जीवनावर कसा परिणाम होतो, याचीही चर्चा करा।

© NCERT not to be republished

## ऋतूंची नावे आणि सण यांच्या जोड्या लावा।











**शिशिर**
दसरा, कोजागरी पौर्णिमा

**उन्हाळा**
गुरु पौर्णिमा, बुद्ध पौर्णिमा, राम नवमी, महावीर जयंती

**वसंत**
गुढी पाडवा, महाशिवरात्र, बैसाखी, होळी

**हिवाळा**
लोहरी, नाताळ, प्रजासत्ताक दिन, गुरुनानक जयंती, बिहू

**पावसाळा**
कृष्णाष्टमी, राखी पौर्णिमा, स्वातंत्र्य दिन

ऋतूंच्या हिंदी आणि इतर प्रादेशिक भाषांमधील वसंत, शिशिर इ। भारतीय नावांबद्दल चर्चा करा। ऋतूंशी संबंधित नसणाऱ्या ईदसारख्या सणांबद्दल त्यांना सांगा।



© NCERT not to be republished



## कॅलेंडरची गंमत

### जानेवारी

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

### फेब्रुवारी

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | | | | |

### मार्च

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

### एप्रिल

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

### मे

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | 31 | | | |

### जून

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | |

### जुलै

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

### ऑगस्ट

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

### सप्टेंबर

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

### ऑक्टोबर

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

### नोव्हेंबर

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

### डिसेंबर

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

*2023 च्या कॅलेंडरनुसार

© NCERT not to be republished

## कॅलेंडर बघा आणि गाळलेल्या जागा भरा।

| महिने | दिवसांची संख्या |
|---|---|
| जानेवारी, मार्च, मे, जुलै, ऑगस्ट, ऑक्टोबर, डिसेंबर | |
| फेब्रुवारी | |
| एप्रिल, जून, सप्टेंबर, नोव्हेंबर | |





## चला बोलू या

A. आपण कॅलेंडर का वापरतो?

B. दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात सारखेच दिवस असतात का?

C. एका आठवड्यात किती दिवस असतात? ☐ दिवस

D. मागच्या पानावर दिलेल्या कॅलेंडरमध्ये एप्रिल महिन्यात किती रविवार आहेत?
☐ रविवार

E. कोणत्या महिन्यांमध्ये 5 रविवार आहेत? ____________, ____________,
____________, ____________, ____________.

F. ____________ आणि ____________ महिन्यात उन्हाळ्याची सुट्टी आहे

G. ____________ आणि ____________ महिन्यात हिवाळ्याची सुट्टी आहे

H. एप्रिल आणि मार्चमध्ये मिळून एकूण किती दिवस आहेत ते काढा।
☐ दिवस + ☐ दिवस = ☐ दिवस



## प्रकल्प कार्य

तुमचा वाढदिवस ज्या महिन्यात येतो, त्या महिन्याचे कॅलेंडर तयार करा आणि तुमच्या वाढदिवसावर खूण करा



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| S | M | T | W | T | F | S |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

आपल्या रोजच्या आयुष्यातील कॅलेंडरचे महत्त्व याविषयी चर्चा करा।







© NCERT not to be republished

## याला किती वेळ लागेल?

कृती आणि त्याला लागणारा वेळ यांच्या जोड्या लावा।


स्वयंपाक


उन्हाळी सुट्टी


पाण्याची टाकी भरणे


स्वेटर विणणे





खेळणे


बीपासून रोप तयार होणे


ऋतू बदलणे


योगासने

वेगवेगळा कालावधी लागणाऱ्या इतर गोष्टींबद्दल चर्चा करा।



© NCERT not to be republished


विजयवाड्याची सहल
तारीख : 24 नोव्हें।
वेळ - सकाळी 8 :
08:25
चला लवकर! आगगाडी निघत आहे।
तारीख : 24 नोव्हें।
वेळ - दुपारी 1 : 15
आजोबा, सव्वा वाजला आहे। आजीकडे पोचायला अजून किती वेळ लागेल?
वजियवाडा रेल्वे स्थानकावर पोचायला आता फक्त 1 तास आहे।
तारीख : 25 नोव्हें।
वेळ - रात्री 10 : 00
आई! आपण आज किती मजा केली! मामा किती रुबाबदार दिसत आहे!
हो तर! त्याचे लग्न आहे ना!
सुखी राहा बाळा!
तारीख : 26 नोव्हें।
वेळ - सकाळी 8 : 00
आई! आपल्याला परवाच्या आगगाडीने परत जायचे आहे ना? मग आज आपण प्रेक्षणीय ठिकाणे पाहण्यासाठी जायचं का?
हो, आपण सकाळी 11 वाजता मंगलगिरीच्या टेकडीवर जाऊ या।













© NCERT not to be republished

## चला बोलू या

A. या कुटुंबाने प्रवासाला जाण्याचे का ठरवले? त्यांनी कुठे प्रवास केला? या सहलीतले त्यांना काय आवडले?

B. त्यांनी कोणत्या दिवशी प्रवास सुरू केला? ते कधी परत आले? त्यांची सहल किती दिवसांची होती?

C. या सहलीत ते कोणकोणत्या ठिकाणी गेले?

D. दिवसातले किती तास त्यांची ही सहल होती?

i. मंगळगिरी टेकडी ______ तास

ii. कोंडवली किल्ला ______ तास

ते तिथून केव्हा परत आले?________

E. या ठिकाणी जाताना ते किती तास आगगाडीत होते?—

i. विशाखापट्टणम् ते विजयवाडा

[ ] ते [ ] ______ तास

ii. विजयवाडा ते विशाखापट्टणम्

[ ] ते [ ] ______ तास

दोन्हीपैकी कुठल्या प्रवासाला जास्त वेळ लागला?

F. तुम्ही इतक्यात कुठल्या प्रवासाला गेला होतात का? तुम्हाला सहलीतले सर्वात जास्त काय आवडते?

## अद्भुत तथ्य

**तुम्हाला माहीत आहे का?**

वंदे भारत ही भारतातली सर्वात जलद आगगाडी आहे। तिचा आराखडा भारतात तयार केला आहे। तिला वेगळा इंजिनचा डबा नसून आगगाडीमध्येच इंजिनचा समावेश असलेली ही पहिली आगगाडी आहे।






कालावधी या संकल्पनेचा दिवस आणि तासांच्या संदर्भात परिचय होण्यासाठी मुलांशी त्यांच्या प्रवासातील अनुभवांविषयी बोला। तसेच त्यांच्या शहराची वैशिष्ट्ये काय आहेत, याचीही चर्चा करा।





© NCERT not to be republished

## गार्गीचा दिवस

गार्गी दिवसभरात काय करते ते पाहू या। प्रत्येक चित्रासाठी वेळ लिहा।






### चला बोलू या

**छोटा काटा (तासकाटा) आणि मोठा काटा (मिनिटकाटा) यांची स्थिती पाहा आणि गार्गी दिवसाच्या कुठल्या वेळेला या कृती करते त्याचे निरीक्षण करा।**

A. ती किती वाजता उठते? ☐

B. ती किती वाजता शाळेत जाते? ☐

C. दुपारचे जेवण ती किती वाजता करते? ☐

© NCERT not to be republished



## करून बघू या

### A. घड्याळात किती वाजले आहेत ते पाहा।









| | | | |
|---|---|---|---|
| ___ वाजले | ___ वाजले | ___ वाजले | ___ वाजले |

### B. घड्याळावर तासकाटा आणि मिनिटकाटा काढा।



3 वाजले



11 वाजले



4 वाजले



9 वाजले



12 वाजले



6 वाजले

© NCERT not to be republished



## C. खाली दिलेल्या कृती तुम्ही किती वाजता करता?

घड्याळावर तासकाटा आणि मिनिटकाटा काढून त्या दाखवा।



अभ्यास



खेळ



दुपारचे जेवण













© NCERT not to be republished

# चला खेळू या - दिशा ओळखणे

वर्गातल्या एका मुलाला किंवा मुलीला पुढे यायला सांगा। त्याचे/तिचे डोळे रुमालाने बांधा। एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जायला सांगा। (उदा। सर्वात मागच्या बाकाकडून फळ्याकडे)। दिशा देण्यासाठी हेच शब्द वापरा- डावीकडे, उजवीकडे किंवा सरळ।

वेगवेगळ्या मुलांचे डोळे बांधून या खेळाच्या 5-7 फेऱ्या होऊ द्या। वर्गातल्या एखाद्या वस्तूवर आदळण्याची शक्यता असेल तेव्हा 'धोका'सारखा एखादा शब्द म्हणायचा, असे मुलांना ठरवायला सांगा।

वेगवेगळ्या मुलांचे डोळे बांधून या खेळाच्या 5-7 फेऱ्या होऊ द्या। वर्गातल्या एखाद्या वस्तूवर आदळण्याची शक्यता असेल तेव्हा 'धोका'सारखा एखादा शब्द म्हणायचा, असे मुलांना ठरवायला सांगा।




## साराचा शाळेत जाण्याचा रस्ता

साराचा शाळेत जाण्याचा रस्ता हिरव्या रेषेने दाखवला आहे। आस्था आणि नियाच्या घरांपासून शाळेपर्यंत जाणारे रस्ते वेगवेगळ्या रंगांनी दाखवा।

> मोबाइल ॲपचा दिशादर्शनासाठी म्हणजे एखादे ठिकाण शोधण्यासाठी होणारा उपयोग याबद्दल मुलांशी चर्चा करा

© NCERT not to be republished

## पूर्व, पश्चिम, उत्तर की दक्षिण

चला आता उभे राहू या
उगवत्या सूर्याकडे तोंड करू या
ही तर आहे पूर्व दिशा।




मागे आहे पश्चिम दिशा।
डावा अंगठा बाहेर काढा- ही तर आहे उत्तर दिशा।
उजवीकडे आहे दक्षिण दिशा।
आपण जेव्हा बाहेर पडू नि चालतचालत पुढे जाऊ
पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण
सगळ्या दिशा जाणून घेऊ

ही कविता हातवाऱ्यांसकट म्हणा। मुलांना दिशा ओळखायला मदत करा। शिक्षकांनी दिशेच्या नावावर जोर द्यावा आणि मुलांना त्यांच्या अगदी जवळच्या भोवतालची उदाहरणे द्यावीत, म्हणजे या शब्दांचा अवकाशीय संबंध त्यांना कळू शकेल।

© NCERT not to be republished



## करून बघू या

**खाली दाखवलेला वर्ग बघा आणि पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण हे शब्द वापरून उत्तरे द्या। (होकायंत्राचा आधार घ्या)।**










A. हनीतचा बाक साराच्या बाकाच्या ____________ दिशेला आहे।

B. अलीच्या बाकाच्या ____________ दिशेला कपाट आहे।

C. फळ्याकडे जाण्यासाठी मीराला आधी ____________ दिशेला जावे लागेल आणि नंतर ____________ दिशेला।

D. खिडकीतल्या पक्ष्यांना खाऊ घालण्यासाठी नितीनला आधी ____________ दिशेला जावे लागेल आणि नंतर ____________ दिशेला।

होकायंत्र आणि त्याचे उपयोग याबद्दल चर्चा करा। तसेच निरनिराळ्या ठिकाणाहून दिशा शोधायला मुलांना सांगा।



© NCERT not to be republished

